# जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

**विषय - कोरोना विषाणू (कोविड -19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**वाचावे** -1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005.

2. साथ रोग अधिनियम, 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडील अधिसूचना कोरोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5, दि.14/03/2020.
4. महसूल व वन विभाग यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/2020/सीआर 92/ डीएसएम 1 दि.23/03/2020, 17/05/2020, 19/05/2020, 31/05/2020, 29/06/2020
5. या कार्यालयाकडील आदेश क्र.आव्यमपु /कार्या 19 अ/513 दिनांक 21/05/2020
6. सचिव, केंद्रीय आरोग्य व कुटुंब मंत्रालय यांचेकडील अ.शा.पत्र दिनांक 01/07/202
7. या कार्यालयाकडील आदेश क्र.आव्यमपु /कार्या 19 अ/771 दिनांक 05/07/2020

क्र. आव्यमपु/कार्या 19अ/ ८०६ /2020 **आदेश** अहमदनगर दि. 15/07/2020

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड -19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 7 अन्वये कोविड -19 चे अनुषंगाने, प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून कोविड -19 चाचणी प्रयोगशाळांमध्ये जलदगतीने चाचणी व प्रयोगशाळांचा पूर्ण क्षमतेने वापर केल्यास बाधित रुग्णांवर तातडीने उपचार करता येतील. त्यास्तव, अहमदनगर जिल्हयातील कोविड -19 चाचणी प्रयोगशाळा व वैदयकीय व्यावसायिकांसाठी सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी, जिल्हयातील खाजगी रुग्णालये / प्रयोगशाळामध्ये कोविड - 19 तपासणीसाठी व्यक्तीचे स्वॅब घेण्यात येतात. सदर व्यक्ती कोरोनाने बाधित झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यास कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने सदर बाधित व्यक्ती Isolation center मध्ये तातडीने दाखल करुन त्यांच्यावर उपचार सुरु करणे व त्यांचे Contact tracing करुन त्याबाबत पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी, अहमदनगर साथ रोग अधिनियम 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने मला प्राप्त अधिकारानुसार **खाजगी रुग्णालये / प्रयोगशाळा (लॅब) व व्यक्तीनां कोविड -19 च्या अनुषंगाने नमुणे तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविल्यास खालील प्रमाणे सुचनांची अंमलबजावणी करण्याबाबत आदेशीत करीत आहे.**

- खाजगी रुग्णालये / प्रयोगशाळा (लॅब) यांना स्वॅब घेताना संबंधीत व्यक्तींचे SPO2 ची तपासणी करावी. स्वॅब घेतलेल्या व्यक्तींची माहिती व सदर व्यक्तीच्या तपासणीमध्ये SPO2 कमी असल्यास तातडीने ग्रामीण भागामध्ये तालुका आरोग्य अधिकारी व महानगरपालिका हद्दीमध्ये वैदयकिय आरोग्य अधिकारी, मनपा, अहमदनगर यांना कळविणे बंधनकारक आहे.

- कोविड -19 पॉझिटीव्ह रुग्णांची माहिती व अहवाल ग्रामिण भागामध्ये तालुका आरोग्य अधिकारी व महानगरपालिका हद्दीमध्ये वैदयकिय आरोग्य अधिकारी, मनपा, अहमदनगर यांना कळविणे बंधनकारक आहे. तालुका आरोगय अधिकारी व वैदयकिय आरोग्य अधिकारी, मनपा, अहमदनगर यांनी सदरील माहिती जिल्हा शल्य चिकीत्सक, अहमदनगर यांना कळवावी.
- तपासणी अहवालानुसार कोरोनाची बाधा झाल्याचे आढळून आलेल्या रुग्ण/ व्यक्ती यांना तातडीने स्वॅब घेतलेले खाजगी रुग्णालय, नजीकचे DCHC, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर येथे किंवा इतर Isolation Center मध्ये भरती होणे बंधनकारक राहील.
- **तपासणी अहवालानुसार कोरोनाची बाधा झाल्याचे आढळून आलेल्या रुग्ण/ व्यक्ती यांना कोणत्याही परिस्थितीत Home Quarantine होता येणार नाही. Home Quarantine झाल्याचे आढळून आल्यास त्यांचेवर साथरोग अधिनियम 1897 मधील तरतूदीनुसार कारवाई करणेत येईल.**
- कोरोनाबाधित रुग्ण / व्यक्ती यांना Contact Tracing दरम्यान त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची माहिती प्रशासनास देणे बंधनकारक राहील.

कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते साथरोग अधिनियम 1897 मधील तरतूदीनुसार भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

(राहुल द्विवेदी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर**

प्रत - 1) जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
2) आयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी.
3) जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडेस कार्यवाहीसाठी
4) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडेस कार्यवाहीसाठी
5) उपविभागीय दंडाधिकारी ------------- (सर्व) यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
6) तहसिलदार तथा Incident Commander ---------------- (सर्व) यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
7) मुख्याधिकारी नगरपालीका / नगरपंचायत ---------- (सर्व) यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
8) जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रसिध्दीसाठी.